# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.
## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| ३०।०९।२०२३ | सभेचे कोरम पूर्ण झाल्याने मिटींगला सुरुवात करण्यात आली. संस्थेचे सचिव यांनी आलेल्या सर्व सभासद बंधू-भगिनी चे स्वागत केले. संचालक मंडळ यांनी व्यासपीठावर येण्यास विनंती करत मान्यवरांचे स्वागत केले व सभेचे पुढील सुत्र संचालन हाती घेत मा. सभापती साहेब यांना सभेचे अध्यक्षस्थान ~~स्विकारण्यास~~ श्री प्रविण धनवंतराव पवार यांना स्विकारण्यास विनंती केली. व सभेला सुरुवात केली. आपल्या कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे ता. जि. धुळे ची विधीमंडळाची (वार्षिक सर्वसाधारण सभा) ५२ वी वार्षिक सभेस सन २०२२-२०२३ या सभेसाठी आपण सर्वजण उपस्थित राहीलात आपले सर्वांचे संस्थेच्या वतीने सचिव म्हणुन मनपूर्वक स्वागत: स्वागत: स्वागत भारत मातेच्या रक्षणासाठी सीमेवर, जे भारतीय वीर जवान शहीद झाले. त्या जवानांना तसेच देशातील थोर व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, शास्त्रज्ञ, साहित्यिक, शेतकरी, उद्योग क्षेत्र, शिक्षणतज्ञ, कृषितज्ञ, व संस्थेचे सभासद व त्यांचे नातेवाईक तसेच कृषि विभागात काम करणारे कर्मचारी काळाच्या पडद्याआड गेले. या सर्वांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. ही सभा त्यांच्या दुःखात सहभागी आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना! ॥ ॐ पूर्णमद: पूर्णमिदं, पूर्णात्पूर्ण मुदच्यते, पूर्णस्य पूर्णमादाय, पूर्ण मेवावशिष्यते ॥ ॐ शांती: शांती: शांती: | | |
| | मा. सभापती साहेब यांनी | प्रास्तविक केले. |
| | १. मागील सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे. | मागील सभा दिनांक:- ०४।०९।२०२२ रोजी वार:- रविवारी सकाळी ठिक ८:०० वाजता सभावली सो. श्री. प्रविण धनवंतराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. संस्थेचे सचिव जगदिश पाटील यांनी १ ते ८ विषयाचे वाचन केले ते योग्य व बरोबर आहेत. सर्व सभासदांनी मंजुर केला. |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.
## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | सुचक :- श्री. नवनाथ नाना साबळे<br>अनुमोदक :- श्री कांतिलाल भावराव साळुंके<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास |
| 2. | सन 2022-2023 चा अहवाल दि. 31/03/2023 चे तेरीज पत्रक, नफा-तोटा, ताळेबंदसह मंजुरी देणे. | आपल्या संस्थेचे सचिव यांनी सभेपुढे सन 2022-23 चा अहवाल, तेरीजपत्रक, नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक सविस्तर रित्या वाचुन दाखविले सर्व पत्रकांची मांडणी करतांना आपली संस्था यावर्षी चांगल्या पध्दतीने कामकाज करत आहे आपल्या संस्थेत कर्जदार सभासद वाढ झाल्यास नफ्यात देखील वाढ होईल असे सांगुन विषयाची सांगता केली सभेने मंजुर केले व कायम केले असे सर्वानुमते ठरले.<br>सुचक :- श्री राजेश बापुराव सोनवणे<br>अनुमोदक :- श्री प्रविण ओंकार राजपुत<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास |
| 3. | अंदाज पत्रकापेक्षा कमी-जादा झालेल्या खर्चास मंजुरी देवुन सन 2023-24 चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे. | आपल्या संस्थेच्या उपसभापती श्रीमती मनिषा दिलिपकुमार देसले यांनी अंदाज पत्रकाचे वाचन सभेपुढे करुन दाखविले त्या अंदाजपत्रकात सर्व खर्च दिलेल्या अंदाजानुसार कमी आहे फक्त उत्पन्न बाजुस नफा-तोटे खाते थोडी वाढ झाली आहे. तसेच सन 2023-24 या वर्षाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | याची मांडणी सभेपुढे केली त्यास मंजुरी दिली कायम केले.<br>असे सर्वानुमते ठरले.<br>सुचक:- श्री. शिवराज धनराज माळी<br>अनुमोदक:- श्री. सतिष नथ्थू कोमकर<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास |
| ४. | सन २०२२-२३ तपासणी/लेखापरिक्षण अहवाल त्यावरील दोष दुरुस्ती पुर्तता अहवाल वाचुन मंजुरी देणे. | आपल्या संस्थेचे संचालक श्री. सिध्दार्थ ईश्वर वाघ यांनी विषयाची सविस्तर मांडणी करत सन ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३ या वर्षाचा तपासणी/लेखापरिक्षण अहवालचे वाचन केले व त्या अहवालातील पूर्ततासाठी प्रमाणित लेखा परिक्षक श्री. छबुलाल रामदास पाटील यांनी लेखा परिक्षण तपासणी अहवालातील भाग 'अ' 'ब' 'क' दोषांची दुरुस्ती दिनांक:- २२/०७/२०२३ च्या मासिक मिटींग मधील विषय/ठराव नं. ६ अन्वये जा.क्र. ६३५/२०२३-२४ ने 'ओ' नमुन्यात कलम ८२/८७ अन्वये हिशोबातील दोष सुधारण्यासंबधीचे तपासणी दोष दुरुस्ती रिपोर्टस प्रतिवृत्तास मान्यता देण्यासाठी मा. विभागीय सहनिबंधक सो. सहकारी संस्था नाशिक. व मा. जिल्हा उपनिबंधक सो. सहकारी संस्था धुळे व मा. जिल्हा विशेष लेखा परिक्षण वर्ग-१ ~~आणि मा. तालुका~~ धुळे यांना मंजुरीसाठी पाठविला आहे. दोष दुरुस्ती योग्य व बरोबर आहे. त्यास सभेने मंजुर केले कायम केले<br>असे सर्वानुमते ठरले. |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | सुचक :- श्री मनोजकुमार भिमन वानखेडे<br>अनुमोदक :- श्री संजय नाना पवार<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास |
| ५. | समितीने केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे. | आपल्या संस्थेचे सभापती श्री प्रविण धनवंतराव पवार यांनी सन २०२२-२३ आर्थिक वर्षाची नफा वाटणी समितीने उपविधी क्रं ग.ग-१।१ या प्रमाणे :-<br>मागील शिल्लक नफा :- ०.२५/-<br>दि.३१/०३/२०२३ नफा :- ८,७७,५५२.१०/-<br>एकुण नफा :- ८,७७,५५२.३५/-<br><br>राखीव निधी उपविधी नियम ग-१।२ प्रमाणे २५% :- २,९६,३८८/-<br>दि.३१/०३/२०२३ शेअर ग-१।३ रु.७५,९५,९५०/- ७% लाभांश :- ५,३१,७१६/-<br>बोनस (अधिलाभांश) उपविधी अधिनियम १९६५ नुसार :- ३४,०००/-<br>प्रशिक्षण निधी :- १५,०००/-<br>उत्तम जिंदगी तरतूद येणेकर्ज रु.२४४४७९९३/- ०.५% :- ६९,९२०/-<br>एकुण :- ८,६९,२२४.००<br>शिल्लक नफा :- ९६,३२८.३५<br>एकुण नफा :- ८,७७,५५२.३५/-<br>वरिल प्रमाणे केलेली नफा वाटणी उपविधी पोटनियमानुसार योग्य व बरोबर आहे. यास सभेने मंजुर केले. कायम केले. असे सर्वानुमते ठरले.<br>सुचक :- श्री हेमंत दगडु बावीस्कर<br>अनुमोदक :- श्री रहिम युसुफ पटेल<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| ६. | सन २०२३-२४ लेखापरिक्षण करणे कामी नामतालीकेतील लेखापरिक्षकांची नेमणूक करणे बाबत. | आपल्या संस्थेचे सभापती श्री प्रविण धनवंतराव पवार यांनी विषयाची मांडणी करतांना सन २०२३-२४ या आर्थीक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण करण्याकरिता तीन लेखापरिक्षकांचे अर्ज अलिपे आहेत ते खालील प्रमाणे :-<br>(१) श्री छब्बुलाल रामदास पाटील<br>(२) श्री धनंजय माधवराव पाटील<br>(३) श्रीमती पद्‍मीनी निखील देशमुख<br>वरील अर्जापैकी श्री छब्बुलाल रामदास पाटील प्रमाणित लेखापरिक्षक, धुळे यांची सन २०२३-२४ या आर्थीक वर्षाचे लेखापरिक्षण करण्याकरिता लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती करण्यात यावी. तसेच त्यांना कळविण्यात यावे व त्यांचे संमती पत्र घ्यावे आणि लेखापरिक्षण झाल्यानंतर नियमानुसार त्यांची फि अदा करण्यात यावी.<br>असे सर्वानुमते ठरले<br>सुचक :- श्रीमती मनिषा एकनाथ पाटील<br>अनुमोदक :- श्रीमती कल्याणी बबन वाघ<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास |
| ७. | सेवानिवृत्ती सभासदांचा सत्कार करणे. | आपल्या संस्थेच्या उपसभापती श्रीमती मनिषा दिलीपकुमार देसले यांनी सेवानिवृत्त सभासद सत्कार समारंभ प्रसंगी सुत्र संचालन केले. या प्रसंगी कार्यक्रमांचे अध्यक्ष श्री बापुसाहेब जे. गावीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी धुळे यांनी स्विकारले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन श्री एन.एम. कोळपकर सो. |

seen
[illegible]

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.
## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | प्रकल्प संचालक आत्मा, धुळे यांची उपस्थिती लाभली. पाहुण्यांचा सत्कार। |
| | | कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री बापुसाहेब जे गावीत साहेब यांचा सत्कार संस्थेचे सभापती श्री प्रविण धनवंतराव पवार यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवुन केला. |
| | | कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री एन.एम. कोळपकर साहेब यांचा सत्कार संस्थेच्या उपसभापती श्रीमती मनिषा दिलीपकुमार देसले यांनी शाल, श्रीफल, पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला. |
| | | ★ सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार ★ |
| | | (1) श्री राजेंद्र दशरथ कोठावदे सेवानिवृत्त अनुरेखक ता.कृ.अ. धुळे यांचा सत्कार अध्यक्ष श्री बापुसाहेब जे. गावीत यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला. |
| | | (2) श्री भटु राजमल वाघ सेवानिवृत्त कृषि पर्यवेक्षक ता.कृ.अ. शिंदखेडा हे त्यांच्या अडचणीमुळे उपस्थित राहिले नाहित। |
| | | सेवानिवृत्त झालेल्या सभासदांचे पुढील आयुष्य आनंदाचे, सुखा समृद्धी, भरभराटीचे, आरोग्य निरोगी राहोत अशा संस्थेच्या वतीने शुभेच्छा दिल्यात। |
| | | तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री बापुसाहेब जे. गावीत साहेबांनी मनोगत व्यक्त करतांना सांगीतले की संस्था ही कोणतीही असो त्या संस्थेचा विकास हा सर्व सभासदांचा विकास आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे कार्य चांगल्या रितीने ~~आह~~ चालले आहे. मला बघुन आनंद वाटला असेच |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | कार्य व पुढील वाटचाल संस्था अधिका-अधिक करावी अश्या शुभेच्छा दिल्या आणि संस्थेचे खेळी-मेळीचे वातावरण पाहुण आनंद वाटला असे सांगत मनोगत व्यक्त केले.<br>शेवटी सेवानिवृत्त कार्यक्रमाचे आभार प्रमुख पाहुण्यांचे व अध्यक्षांचे उपस्थिती बद्दल आभार श्रीमती मनिषा दिपकुमार देसले यांनी मानलेत. असे सर्वानुमते ठरले.<br>सुचक:- श्री तुषार केशव बैसाणे<br>अनुमोदक:- श्री कैलास रामदास नेरे<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास. |
| | ८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार विनीमय करणे. | |
| | ९ प्रासंगिक / सण अग्रिम कर्ज देणेबाबत विचार करणे. | सभासदांच्या सुचनेनुसार आपल्या संस्थेचे कर्ज मागणीत वाढ होणेकरिता प्रासंगिक / सण अग्रिम कर्ज देण्यात यावे याबाबत मासिक मिटींग चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा. संचालक मंडळाने निर्णय घेण्यात यावा.<br>~~[illegible]~~ असे सर्वानुमते ठरले<br>सुचक:- श्री मुकेश भाईदास सोनवणे<br>अनुमोदक:- श्री भरत भास्करराव अहिरराव<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास. |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.
## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | (७) इंदिरा सहकारी बँक लि. धुळे (ठेवी) डिपॉझिट व सेव्हिंग खाते अद्यावत आजलागायत काय परिस्थिती आहे चर्चा करण्यात आली. | वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांनी आपल्या संस्थेचे इंदिरा सहकारी बँक लि. धुळे कडे असलेल्या ठेवी (डिपॉझिट) आणि सेव्हिंग खाते रक्कम ची अद्यावत आजलागायत काय परिस्थिती आहे याबाबत सभेत चर्चा करण्यात आली. त्यानुसार मा. सभापती सो श्री. प्रविण पवार साहेबांनी चर्चे दरम्यान सांगितले इंदिरा बँकेकडे असलेल्या ठेवी (डिपॉझिट) / सेव्हिंग रक्कम त्यावरील व्याज बाबत मा. सहकार न्यायालय नाशिक यांनी अंतिम निकाल संस्थेच्या लाभात दिलेला आहे. मा. अवसायक इंदिरा बँक हे यांनी मा. औरंगाबाद न्यायालयात अपिल केली असता ते देखिल निर्णय संस्थेच्या लाभात दिलेला आहे. त्यानुसार संस्थेचे ठेवी सेव्हिंग खाते रक्कम वसुली साठी मा. सिव्हील कोर्ट धुळे येथे स्पेशल दरखास्त दाखल केलेली आहे. सदर दाव्याच्या निकाल पतसंस्थेच्या बाजुने लागण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न चालु आहेत.<br>असे सर्वानुमते ठरले<br>सूचक :- श्री मुकेश भाईदास सोनवणे<br>अनुमोदक :- श्री अमित शरदराव भामरे<br>ठराव सर्वानुमते मंजूर<br>सर्वानुमते पास.<br><br>आपल्या संस्थेचे सचिव यांनी आभार प्रदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुखपाहुणे व सर्व सेवानिवृत्त सत्कारमूर्ती तसेच |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| | | सभेसाठी ज्यांनी होम, साऊंड सिस्टीम, सुरुची स्वाद असलेला नास्ता उपलब्ध करून देणारे कुलथे दादा बालकृष्ण मंगल कार्यालय नकाणे, रोड, देवपुर धुळे आणि सभेसाठी उपस्थित असलेले सर्व सभासद बंधु/भगिनी यांचे संस्थेतर्फे मनपूर्वक आभार मानले. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय गित जन-गण-मन ने करून कार्यक्रम संपला असे जाहिर केले. |

कायदे व नियमाप्रमाणे

(सी.आर.पाटील)
प्रमाणित लेखा परिक्षक
सहकारी संस्था, धुळे.
NSK/dhl/28
दि. [illegible]

[illegible] सभापती
कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्या. धुळे